# उच्चशिक्षणात मुलींची झेप...

## उच्च पदवीधर मुलींचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadam

**कोल्हापूर :** 'मुलगी शिकली, प्रगती झाली' या उक्तीचा प्रत्यय शिवाजी विद्यापीठात उच्चशिक्षणातील मुलींच्या वाढत्या आलेखातून येत आहे. ५० वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान कार्यक्रमात एकूण विद्यार्थ्यांपैकी १८ टक्के मुलींनी पदवी घेतली होती. तर यावर्षी पदवीप्रमाणपत्र घेणाऱ्या मुलींची संख्या एकूण विद्यार्थ्यांच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे. पाच दशकांतील हा वाढता टक्का पाहता उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या लक्षणीय वाढल्याचे दिसून येते. ज्या अभ्यासक्रमांना मुली प्रवेशही घेत नव्हत्या, अशा अभ्यासक्रमांत आता मुलींची पटसंख्या सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या १९६४ साली झालेल्या पहिल्या पदवीदान कार्यक्रमात १०९४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली होती. याच मुलींची संख्या केवळ १९९ इतकी नगण्य होती. टक्केवारीत बोलायचे तर हे प्रमाण त्यावेळी १८ टक्के होते. तर फेब्रुवारी २०१८मध्ये झालेल्या पदवीदान कार्यक्रमात ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. त्यामध्ये मुलींची संख्या २६ हजारांपेक्षा जास्त आहे. हे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक आहे. गेल्या काही वर्षांत मुलींच्या शिक्षणाबाबत झालेला प्रसार, पालकांमध्ये होत असलेली जागृती, शालेय, माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेचे वाढते प्रमाण, मुलींना विविध क्षेत्रात मिळत असलेल्या संधी यामुळे उच्च शिक्षणाबाबत मुली सजग झाल्याचा हा दाखला आहे.

पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्याही मुलांच्या तुलनेत वाढली आहे. शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या मुलींची संख्या २२२७ असून मुलांची संख्या १४२६ आहे. मुलींनी उच्चशिक्षणात चांगले यश मिळवत, पदवी म्हणजे मुलींच्या शिक्षणासाठी पूर्णविराम या समीकरणालाही छेद दिला आहे. विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदानानंतर दहा वर्षांत मुली पदवीधर होण्याचे प्रमाण १० टक्क्यांनी वाढले तर पुढच्या वीस वर्षांत हेच प्रमाण १६ टक्क्यांच्या पुढे गेले. गेल्या पाच दशकांत उच्चशिक्षणातील मुलींच्या संख्येने एकूण विद्यार्थीसंख्येच्या ५० टक्क्यांचा आलेख गाठला आहे.



### शास्त्र शाखांकडे वाढला कल

कलाशाखेतील भाषा आणि काही सामाजिक शास्त्रांतील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेण्याकडे मुलींचा कल होताच. वाणिज्य शाखेतील पारंपरिक पदवी, पदव्युत्तर शिक्षणात मुलींची संख्या लक्षणीय असायची. कलाशाखेतील राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांसह वाणिज्य शाखेतील संख्याशास्त्र, गणित, स्टॅटिस्टिक या शाखांतील उच्चशिक्षणाकडे मुली क्वचित वळत असल्याचे चित्र काही वर्षांपूर्वी प्रकर्षाने दिसायचे. आता हे चित्र अमूलाग्र बदलले आहे. या शाखांत सर्वाधिक संख्या मुलींचीच आहे. शास्त्र शाखेतील वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भौतिकशास्त्र, भूगर्भशास्त्र, भूगोल या शाखांमधून पदव्युत्तर शिक्षण व संशोधनाकडे मुलींचा कल गेल्या पाच वर्षांत लक्षणीय वाढला आहे. प्रवेश अर्जांमध्येही मुलींचीच संख्या अधिक असल्याने केवळ औपचारीक पदवी घेण्यापेक्षा पदव्युत्तर पदवीत सध्या मुलींची संख्या सर्वाधिक आहे.

**"लग्न ठरेपर्यंत शिक्षण घ्यायचे किंवा लग्न ठरले म्हणून शिक्षण थांबवायचे या मानसिकतेतून पालक बाहेर पडले. सर्व क्षेत्रांतील करिअरसाठी मुलींना उपलब्ध असलेल्या संधी याचा परिणाम म्हणून उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढली आहे. विद्यापीठात दरवर्षी पदवी घेणाऱ्या स्नातकांमध्ये मुलींचा टक्का वर्षागणिक वाढला आहे. वेगळ्या शाखा निवडण्याकडे मुलींचा असलेला कल हे सामाजिक व वैचारिकदृष्ट्या प्रगतीचे द्योतक आहे.**

– **डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### संशोधनातही हवा वाढता आलेख

पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींची घोडदौड कौतुकास्पद असली तरी संशोधनाकडे मुलींचा ओढा कमी असल्याचे दिसून येते. पीएचडीसाठी प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत निम्मी आहे. यंदा पीएचडीसाठी सव्वाचारशे मुलांनी प्रवेश घेतला. तर पीएचडी प्रवेश परीक्षा देणाऱ्या मुलींची यंदाची संख्या अवघी २७४ आहे. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुली संशोधनात मागे राहत असल्याचे यावरून दिसून येते. संशोधन क्षेत्रात मुलींना योगदान देण्याची गरज आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 SEP 2018

तरुण भारत

# प्रशासकीय कामाचा निपटारा सुलभ होण्याची गरज

## कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे प्रतिपादन : एमबीए विभागातर्फे कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रशासनामधील प्रचलित कार्यप्रणालीच्या माध्यमातून कामाचा निपटारा सहज, सुलभतेने व जबाबदारपूर्वक व्हावा, हा उद्देश जोपासून कर्मचाऱ्यांनी योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. अधिविभागातर्फे ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स" या विषयावरील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गणेश मांझा यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत डॉ. एच. एम. ठकार, डॉ. गणेश मांझा, अजित चौगुले.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रशासकीय सेवक, अधिकारी यांना प्रशासकीय कामकाजाच्या अद्ययावत पद्धतीची माहिती देण्यासाठी ही अकादमी स्थापन केलेली आहे. भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सर्व स्तरावरील प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांसाठी एक ते चार दिवसांच्या अशा पद्धतीच्या मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यामुळे वेगवेगळ्या आस्थापनांवरील प्रशिक्षित सेवक, अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे सुलभ होईल. कार्यालयीन कामकाजामध्ये महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्ट २०१६ अन्वये घ्यावयाच्या निर्णयाची सुरूवात अधीक्षक पातळीपासून होते. त्यामुळे पूर्ण क्षमतेने व जबाबदारीने विविध विषयांवरील टिपणींचे सादरीकरण संबंधित विषयाच्या अनुषंगिक संपूर्ण माहितीसह होणे आवश्यक आहे. अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी अधीक्षकांनी सदैव दक्ष राहिले पाहिजे. कामकाजात गती येण्यासाठी कार्यालयामधील निरोगी वातावरणाची निर्मिती सुसंवादाने होईल. प्रत्येकास संगणकाचे अद्यावत ज्ञान असणे आवश्यक आहे. विद्यापीठाने कार्यान्वित केलेल्या मिटींग सॉफ्टवेअरची मागणी अनेक पातळीवरून होत आहे. एम. बी.ए. अधिविभागप्रमुख डॉ. एच.एम. ठकार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी लेखापाल अजित चौगुले यांच्यासह विद्यापीठातील अधीक्षक, सहाय्यक अधीक्षक उपस्थित होते.

सकाळ

# जलद कामासाठी कर्मचाऱ्यांचे योगदान हवे

## डॉ. विलास नांदवडेकर; शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २ : 'शिवाजी विद्यापीठ प्रशासनातील प्रचलित कार्यप्रणालीच्या माध्यमातून कामाचा निपटारा जबाबदारीने करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी योगदान द्यावे,' असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे 'ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. ॲकॅडमी ऑफ ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबईअंतर्गत ही पहिली कार्यशाळा झाली.

श्री. नांदवडेकर म्हणाले, ''कामकाजाच्या अद्ययावत पद्धतीची माहिती देण्यासाठी अकादमी स्थापन केली आहे. भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांसाठी एक ते चार दिवसांच्या मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजनाचा विद्यापीठाचा मानस आहे. त्याचा आस्थापनांवरील प्रशिक्षित सेवक, अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपयोग होईल.''

ते पुढे म्हणाले, ''अधिकार



मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी अधीक्षकांनी सदैव दक्ष राहिले पाहिजे. कामकाजात गती येण्यासाठी कार्यालयामधील निरोगी वातावरणाची निर्मिती सुसंवादाने होईल. प्रत्येकास संगणकाचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे. विद्यापीठाने कार्यान्वित केलेल्या मीटिंग सॉफ्टवेअरची मागणी अनेक पातळीवरून होत आहे. कामकाजात विद्यार्थी केंद्रित हिताची जपणूक प्राधान्याने केली पाहिजे.''

एमबीए अधिविभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गणेश मांझा, अंतर्गत लेखापाल अजित चौगुले उपस्थित होते.

Kolhapur, Main
03/09/2018 Page No. 102

13 SEP 2018 Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Applications open for one month certificate course in Modi script

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The city-based Night College of Arts and Commerce will be offering a certificate course in the Modi lipi, a six-century-old script, which was earlier used to write Marathi.

The 30-days certificate course will be held from September 10 to October 10. Classes will be conducted between 6pm and 8pm. Those who wish to apply can contact Arun Shinde — 9421024055. Candidates who have passed Class X are eligible to apply.

Pic for representational purpose



The six-century-old script was earlier used to write Marathi and enables historians to read old documents of the Maratha era

CAMPUS BUZZ

The course has proved useful for the students of history as well as researchers working on the documents in the Maratha era.

Kolhapur city has great historic tradition and learning the script will held one learn more about its historical importance as many of the documents from Maratha era are found in the Modi script, a circular from the Night College stated.

The seats for the courses will be alloted on the first come first serve basis and those reserving their seats will get priority. With detailed exposure to the lectures and practical, the candidates will be able to read documents from the Maratha era.

### Seminar on research

The mechanical engineering department of the city-based Bharati Vidyapeeths College of Engineering will organized a seminar on research paper writing, patent filing process and paper presentation skills last week.

Alex Gamberg from Ural Federal University, Russia, interacted with the students through video conferencing.

During his interaction, he covered topics on how to select the topic for research or project, research paper writing skills, use of important websites, patent filing process, importance of Russian, American and Indian patent process, a press statement from the college stated.

The college officials are also discussing a plan to sign a memorandum of understanding with the Ural Federal University, the statement added.

### Lecture by Kei Noda at SUK

The department of Technology of Shivaji University, Kolhapur hosted a seminar on Semiconductor film preparation by solution-based process toward electronic devices application and photoenergy last week.

Kei Noda from Keio University delivered a lecture on the topic and also discussed the education pattern in the Japanese education system.

Noda further said that Japan has lot of demand for engineers and Indian engineers can fulfil that demand.

### PG diploma in museology

The Shivaji University, Kolhapur is inviting applications for a PG diploma course in Museology.

The last date to fill in the application is September 7. Further details are available on their official website.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 SEP 2018
Times of India

# SUK to add value-added courses in curriculum

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its departments to add courses that add value to the existing curriculum. It has sought that departments organise lectures and workshops and help students approach problems with a practical approach.

DT Shirke, pro-VC, SUK, told TOI, "Value added courses are of 30 hours duration and each department has been asked to prepare one. Even though it will not bear any academic credentials, it will be helpful for students to get to learn and participate in various activities and learn from hands-on experience."

He said departments would prepare modules of the course aimed at easing the pressure of academics and introducing students to different aspects of the academic programme. Shirke said half the departments in the university have already implemented the course.

At the Department of Zoology earlier this year, experts offered students insights on decorative fishes. Students got information on breeding techniques of decorative fishes. Shirke said inviting experts for such event could come at a cost. "We have asked departments to not to worry about finances as these will be granted from the varsity funds," he said.

There are 43 departments at the university. Two more are to be added from the 2018-19 academic year. Earlier this year, University Grants Commission (UGC) also asked varsities and colleges to introduce an induction program as part of the curriculum.

The SAGE (Socialising, Associating, Governing, Experiencing) programme was aimed at introducing new students to senior students and offering fresh students the support they need to learn from peers.